पोलीस उप अधिक्षक • अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव • सत्यमेव जयते

# प्रेस नोट

**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**दि.१८.०४.२०२३**

आलोसे क्रं. **१)**रविंद्र लक्ष्मण धांडे,वय ५४,कोतवाल,तहसिल कार्यालय, भुसावळ,जि.जळगांव रा.जुना सातारा रोड,भुसावळ ता.भुसावळ,जि.जळगाव व **२)**हरीष देविदास ससाणे,वय ४३,व्यवसाय ऑनलाईन सुविधा केंद्र, रा.दादासाहेब रुपवती हौसींग सोसायटी, आंबेडकर नगर,भुसावळ जि.जळगांव **(खाजगी ईसम)** पैकी आलोसे क्रं.१ यांनी १२०००/– रुपये लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.२ यांनी आलोसे क्रं.१ यांच्या उपस्थितीत स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद क्रंमाक** | :– | भुसावळ शहर पो.स्टे. गु.र.नं.४९/२०२३ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ व ७ अ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | १)रविंद्र लक्ष्मण धांडे,वय ५४,कोतवाल,तहसिल कार्यालय, भुसावळ,जि.जळगांव रा. जुना सातारा रोड,भुसावळ ता.भुसावळ,जि.जळगाव **(महसुल विभाग वर्ग ४)**<br>२)हरीष देविदास ससाणे,वय ४३,व्यवसाय ऑनलाईन सुविधा केंद्र, रा.दादासाहेब रुपवती हौसींग सोसायटी, आंबेडकर नगर,भुसावळ जि.जळगांव **(खाजगी ईसम)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१८/०४/२०२३ रोजी<br>प्रथम १५,०००/–रु.व तडजोडीअंती १२,०००/–रु.लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | १२,०००/– रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१८/०४/२०२३ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी यांनी भुसावळ तालुक्यातील कुन्हे पानाचे शिवारातील शेत गट नं. ६७१/१ मधील ८१ आर ही शेत जमीन दि.०५.१२.२०२२ रोजी दुय्यम निबंधक, भुसावळ येथे विहीत खरेदी खत करुन स्वत:चे नावे खरेदी केली आहे. फिर्यादी यांनी सदर शेत शेतजमीनीच्या ७/१२ उताऱ्यावर त्यांचे नाव लावण्यासाठी विहित नमुन्यात लेखी अर्ज तलाठी कुन्हे पानाचे या कार्यालयात सादर केला होता. परंतु फिर्यादी व त्यांचे वडीलांचे नावात तफावत असल्याने सदर नोंद रद्द होणे बाबत त्यांना कुन्हे पानाचे तलाठी कार्यालयाकडुन नोटीस मिळाली होती. सदरची त्रुटी ही भुसावळचे मंडळ अधिकारी योगीता पाटील यांनी काढल्याचे फिर्यादी यांना समजले होते. त्यावर फिर्यादी यांनी तहसिल कार्यालय भुसावळ येथे जावुन मंडळ अधिकारी योगिता पाटील यांची भेट घेवुन त्रुटी बाबत विचारणा केली. त्यावर त्यांनी फिर्यादी व त्यांच्या वडीलांच्या नावात तफावत असल्याचे सांगुन सदरचे प्रकरण परत सादर करावे लागेल असे सांगितले होते.त्यानंतर माहे मार्च २०२३ मध्ये फिर्यादी यांनी सदर प्रकरणात असलेल्या त्रुटींची पुर्तता करुन मंडळ अधिकारी यांची भेट घेतली असता त्यांनी सदर प्रकरण पाहुन ते फिर्यादी यांना आलोसे क्र. १ यांचे कडेस देण्यास सांगीतले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी सदर प्रकरण आलोसे क्र. १ यांचे कडे दिले होते. त्यानंतर फिर्यादी दि.१२.०४.२०२३ रोजी तहसिल कार्यालय भुसावळ येथे जावुन आलोसे क्र.१ यांची भेट घेउन त्यांचे प्रकरणा संदर्भात विचारपुस केली. तेव्हा आलोसे क्र.१ यांनी फिर्यादी यांना मंडळ अधिकारी योगीता पाटील यांनी मला तुमच्या कडुन सदर प्रकरणाच्या नोंदीसाठी १५,०००/–रु घेण्यास सांगीतले आहे.तुम्ही खरेदी केलेल्या जमीनीच्या ७/१२ उताऱ्यावर तुमचे नाव मंडळ अधिकारी योगिता पाटील यांचे कडुन लवकरात लवकर करुन आणुन देतो, असे सांगुन १५,०००/–रुपये लाचेची मागणी केली.त्याबाबत फिर्यादी यांनी दि. १८.०४.२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव येथे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची ला.प्र.वि.जळगाव पथकाने दोन पंचासमक्ष दि.१८.०४.२०२३ रोजी पडताळणी केली असता आलोसे क्र. १ यांनी फिर्यादीने खरेदी केलेल्या शेत जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर नाव लाउन देण्याचे काम मंडळ अधिकारी योगीता पाटील यांचेकडुन लवकरात लवकर करुन आणुन देतो असे सांगुन, प्रथम १५,०००/– रुपये व तडजोडीअंती १२,०००/– रुपये लाच मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र. २ यांचेकडेस देण्यास सांगीतली. त्याप्रमाणे सदर लाच रक्कम पंचासमक्ष आरोपी क्र. २ यांनी आलोसे क्र. १ यांचे उपस्थतीत वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
**ईमेल आयडी:**– dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:**– acbmaharastra.gov.in
**टोल फ्री क्रंमाक:**– 1064,दुरध्वनी **क्रंमाक:**–0257-2235477
**व्हॉटस्अॅप क्रंमाक:**– 8766412529

18.04.2023

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**